**L. C. BILL No. XVI OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १६.**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९७१ चा महा. २८. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३४अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ याच्या कलम ३४अ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९७१ चा महा. २८.

"(१) राज्य शासन, अध्यक्षाचा व शासनाला योग्य वाटतील अशा संख्येतील सदस्यांचा समावेश असणारी आणि या अधिनियमान्वये शासन तिच्याकडे सोपवील अशा अधिकारांचा वापर करण्याच्या व अशी कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, शिखर तक्रार निवारण समिती किंवा समित्या, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घटित करील.".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १६.]**

**[ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण).**]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानसभेने दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.